# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*




पाटण : राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमप्रसंगी प्रांत सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, बकाजीराव निकम.

## राष्ट्रीय ग्राहक दिन पाटणमध्ये उत्साहात

**पाटण :** येथील प्रांताधिकारी व तहसील कार्यालय, पाटण व जागृत ग्राहक राजा संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. येथील प्रांत व तहसील कार्यालयात महाराष्ट्र राज्य जागृत ग्राहकराजा संघटना व महसुल विभागाच्या संयुक्त विद्यमाने २४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव तसेच संघटनेचे तालुकाध्यक्ष बकाजीराव निकम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर, पुरवठा अधिकारी कोळेकर तसेच प्रकाश शिंदे, निलेश बांडे, आनंद पावसकर, बाळासाहेब देसाई, भैयासाहेब मुलाणी, बाळासाहेब देसाई कॉलेजचे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच मान्यवरांसह ग्राहक व नागरिक उपस्थित होते.